**MHKO110008322024**

**म. कौ. हिं. स. अ. अर्ज क्र. १७/२०२४.**
(CNR No. **MHKO110008322024**)

**निशाणी क्रमांक १२ खालील आदेश.**
(ज्योती घागरे वि. साईराज घागरे)

गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून, प्रस्तुत प्रकरणामधून त्यांची नांवे कमी करण्याची विनंती केली आहे.

०२. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांचे असे कथन आहे की, प्रस्तुत प्रकरणामध्ये अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांच्या विरोधात खोटी व चुकीची कथने करून न्यायालयाची दिशाभूल केली आहे. तसेच, अर्जदार हिने तिच्या कथनांच्या पुष्ट्यर्थ कोणताही पुरावा सादर केलेला नाही. तसेच, विनंती कलमांमध्ये अर्जदार हिने गैरअर्जदार क्र.२ व ३ यांच्या विरुद्ध कोणतीही दाद मागितलेली नाही. सबब, या सर्व कारणांसाठी गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना प्रस्तुत प्रकरणामधून वगळण्यात येवून त्यांची नांवे प्रकरणातून कमी करण्याची विनंती त्यांनी केली आहे.

०३. अर्जदार हिने **निशाणी क्र.१३** वर प्रस्तुत अर्जासाठी तिचे म्हणणे दाखल केले आहे. अर्जदार हिच्या म्हणण्यानुसार, गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी तिच्यावर शारिरीक, मानसिक व आर्थिक अत्याचार केलेला आहे. तसेच, त्यांनी अर्जदार हिच्यावर खोटे आरोप करून कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी केवळ प्रकरणामध्ये वेळ काढण्यासाठी व प्रकरण प्रलंबित ठेवण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे, अर्जदार हिने सदरचा अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

०४. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले. तसेच प्रकरणातील सर्व कागदपांचे अवलोकन केले. दोन्ही पक्षकारांचा युक्तिवाद ऐकला.

०५. कौटुंबिक हिंसाचार अंतर्गत अर्जातील कथने व अर्जदार हिचे शपथपत्र सर्वप्रथम विचारात घेणे आवश्यक ठरते. त्या अनुषंगाने गैरअर्जदार क्र. २ व ३ यांनी गैरअर्जदार क्र.१ चे अन्य महिलेसोबत असणारे अनैतिक संबंधाबाबत चर्चा केल्याबाबत कथने आहेत. त्याचप्रमाणे गैरअर्जदार क्र.१ यांना सुधारण्यासाठी गैरअर्जदार क्र.२ व ३ यांनी अर्जदार हिचा बळी दिल्याचे तसेच, गैरअर्जदार क्र.१ बाबत संपूर्ण माहिती गैरअर्जदार क्र.२ व ३ यांना पूर्वीपासून असल्याचे देखील कथन अर्जात दिसून येते. त्याचप्रमाणे अर्जदार हिच्या अर्जातील मागणीचा विचार केला असता, तिने गैरअर्जदार यांच्या घरात स्वतंत्र निवासाच्या सोयीबाबत तसेच, घर मिळकत उपभोगण्यापासून हरकत अडथळा न करण्याबाबत तसेच, गैरअर्जदार क्र.१ ते ३ यांनी अपमानास्पद बोलू नये असा आदेश करण्याबाबत विनंती केल्याचे अवलोकित होते. अशा परिस्थितीमध्ये गैरअर्जदार क्र.२ व ३ यांची नांवे अर्जातून कमी केल्यास अर्जदाराचे कधीही न भरून येणारे असे नुकसान होणार आहे. सबब, अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरत नाही. सबब, मी खालील आदेश पारित करत आहे.

## आदेश.

१. अर्ज निशाणी क्र.१२ नामंजूर करण्यात येत आहे.

२. येणेप्रमाणे अर्ज निकाली करण्यात येत आहे.

Digitally signed by SHRINIVAS ARUN KULKARNI
Date: 2025.06.13 16:30:53 +0530

दिनांक १३/०६/२०२५. (**श्रीनिवास अ. कुलकर्णी**)
पेठवडगांव. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, पेठवडगांव.